महाराष्ट्र शासन

**शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक**

(महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक स्वायत्त संस्था)

चेहडी (बु.!!),सामनगांवरोड,नाशिकरोड, नाशिक. **पिनकोड**-४२२१०१ **दुरध्वनी क्र.** ०२५३.२४६१२

**Email Id:** office.gpnashik@dtemaharashtra.gov.in **Web:** www.gpnashik.ac.in

जा.क्र. शातंनिना/वि वि/२०२३/ १९७० दिनांक :— 11 AUG 2023

# सर्व प्रथम,द्वितीय व तृतीय वर्ष प्रवेशित विद्यार्थ्याकरीता महत्वाची सुचना

**संदर्भ : मा.उपसंचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क.१८/तंशिसं/डीबीटी/ विकाप/२०२२-२३/२०८, दिनांक : ३.८.२०२३**

शैक्षणिक वर्ष **२०२२ - २३** मध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या व शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या **ओ.बी.सी./एस.सी./एस.टी./व्ही.जे.एन.टी./एस.बी.सी./ई.बी.सी./अल्पसंख्यांक विद्यार्थी** यांना सुचित करण्यात येते की mahadbt portal वर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची तारीख शासनाने वरील संदर्भान्वे **दिनांक १७.०८.२०२३** पर्यंत वाढवली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरलेला नाही, अशा विद्यार्थ्यींनी ऑनलाईन अर्ज भरुन सदर अर्ज विद्यार्थी विभागात **दिनांक १७.०८.२०२३** या तारखे पर्यंत जमा करावे.जे विद्यार्थी शिष्यवृत्ती अर्ज भरणार नाही व त्यांना शासनाकडुन शिष्यवृत्ती प्राप्त होणार नाही अशा विद्यार्थ्यांना नियमानुसार **शिक्षण शुल्क रु.६०००/-** जमा करावी लागेल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे शिष्यवृत्ती अर्ज काही त्रुटींमुळे विद्यार्थ्यांना परत पाठविण्यात आलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी सदर अर्जा मधील त्रुटींची पुर्तता करुन अर्ज RE-APPLY करावे.** सदरील अर्ज RE-APPLY करण्याची तारीख देखील शासनामार्फत **दिनांक १७.०८.२०२३** पर्यंत वाढविण्यात आली आहे.

**संस्थेतील मेकॅट्रॉनिक्स, पॉलीमर टेक्नॉलॉजी व इंटेरिअर डिझाईन** या शाखेतील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रथम व द्वितीय या वर्षातील सर्व प्रवर्गातील विद्यार्थी यांनी MAHADBT PORTAL वर शिष्यवृत्तीचे अर्ज भरावे. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज दिनांक **१७.०८.२०२३** या तारखे पर्यंत ऑनलाईन भरुन विद्यार्थी विभागात सादर करावे. **ज्या विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास अडचण येईल अशा विद्यार्थ्यांनी विद्यार्थी विभागाशी संपर्क साधावा.**

**छत्रपती शाहु महाराज शिष्यवृत्ती या योजने अंतर्गत अर्ज भरतांना विद्यार्थ्यांनी त्या-त्या वर्षाचा उत्पनाचा दाखला अर्जा सोबत अपलोड करावा.**

(डॉ.गोरक्ष विठोबा गर्जे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक

प्रत:- मुख्य सुचना फलक
सर्व विद्याशाखेतील सुचना फलक/मुलांचे व मुलींचे वसतिगृह सुचना फलक/ मुख्य प्रवेशद्वार सुचना फलक

प्रत:- प्रोग्रामर, शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
/- त्यांना कळविण्यात येते की, सदरची सुचना ही संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.